महाराष्ट्र शासन
# शासकीय तंत्रनिकेतन, मिरज
माजी सैनिक वसाहत जवळ, विद्दयानगर, मिरज- ४१६४१०
दुरध्वनी क्रमांक - कार्यालय (०२३३)२२३१४२३, फॅक्स -(०२३३) २२३१२६९
संकेत स्थळ - www.gpmiraj.ac.in email - gpmiraj@gmail.com

जा.क्र.:-शांतनिमि/लेखा/२०२०/ ११८ दिनांक 19 MAY 2020

**परिपत्रक :-**

विषय :-राज्यातील कोरोना आपत्ती निवारण उपाय योजनांकरीता आपत्ती निवारणाच्या राज्यातील सर्व आधिकारी/कर्मचारी यांच्या माहे मे २०२० च्या वेतनातील एक/दोन दिवसांचे वेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधी मध्ये देणगी म्हणुन उपलब्ध करुन देणे बाबत..

संदर्भ :- महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाचे शासन परीपत्रक क्र.संकीर्ण -११२०/प्र.क्र.७५/१६अ दिनांक १८ मे २०२०

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन संस्थेतील सर्व आधिकारी व कर्मचारी यांना कळविण्यात येते की संदर्भीय शासन परीपत्रका नुसार राज्यातील बहुतांश जिल्हयात मोठया प्रमाणावर कोरोना विषाणुचा प्रादृभाव झाल्यामुळे गंभीर परीस्थीती उदाभवली आहे.या आपत्तीस सामोरे जाण्यासाठी सहाय्य व मदत पुर्नवसनाच्या कामास आपलाही हातभार लागावा म्हणुन संस्थेतील सर्व गट-अ व गट -ब चे (राजपत्रीत ) आधिकाऱ्यांनी माहे मे.२०२० च्या आपल्या वेतनातील प्रत्येकी दोन दिवसांचे तसेच संस्थेतील गट-ब (अराजपत्रीत ), गट क व गट ड कर्मचारी यांनी प्रत्येकी एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये देण्याबाबत हरकत नसावी.

संस्थेतील सर्व आधिकारी व कर्मचारी यांनी आपले एक /दोन दिवसाच्या वेतन कपातीस हरकत असल्यास हरकत/अनुमती पत्र सोबत जोडलेल्या नमुन्यात आपल्या विभाग प्रमुख /प्र.विभाग प्रमुख /कर्मशाळा अधिक्षक /ग्रंथपाल/प्रबंधक यांचे मार्फत लेखा विभागास दिनांक २३/०५/२०२० पर्यंत लेखी कळवावे अन्यथा गट-अ व गट -ब चे (राजपत्रीत ) आधिकारी यांचे दोन दिवसाचे व गट-ब (अराजपत्रीत ), गट क व गट ड कर्मचारी यांचे एक दिवसाचे वेतन कपात करण्यास हरकत नाही असे समजण्यात येईल.

(कॅप्टन डॉ. एन. पी. सोनजे)
प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन,मिरज.

सोबत :-अनुमती/ हरकत पत्र नमुना

प्रत:-१)सर्व विभागप्रमुख सदरचे परीपत्रक आपल्या विभागातील सर्व गट अ,ब,क,ड आधि./कर्मचारी यांच्या निर्दर्शनास आणावे.

१. स्थापत्य विभाग २. यंत्र विभाग. ३. संगणक विभाग ४. वैदयकीय अणुविदयुत विभाग. ५. प्लॅस्टीक विभाग. ६. उपयोजीत यंत्रशास्त्र विभाग ७. विज्ञानविभाग ८. कर्मशाळा ९. ग्रंथालय १०. कार्यालय.

११)श्री.काळे एस.पी. प्रोग्रॅमर सदरचे परीपत्रक संस्थेच्या संकेत स्थळावर ठेवण्यात यावे.

Scanned with CamScanner

**<u>अनुमती / हरकत पत्र</u>**

मी, श्री./श्रीमती/कुमारी ...................................................... आपल्या विभागात / कार्यालयात ......................... पदावर कार्यरत आहे.

राज्यातील बहुतांश जिल्ह्यांत मोठ्या प्रमाणावर कोरोना विषाणूचा प्रादूर्भाव झाल्यामुळे गंभीर परिस्थिती उद्भवलेली असून, या आपत्तीच्या निवारणाकरिता राज्य शासनामार्फत करण्यात येणाऱ्या उपाययोजनांसाठी, राज्य शासनास मदत म्हणून माहे मे, २०२० च्या माझ्या वेतनातून एक/दोन दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये देण्यास मी इच्छुक आहे/ माझी हरकत आहे.

विभागातील/कार्यालयातील रोख कार्यासन व रोखपाल यांनी माझ्या मे २०२० च्या देय वेतनातून एक/दोन दिवसांचे वेतन कपात करून घेण्यास माझी सहमती / हरकत आहे.

आपला / आपली,

स्थळ:-
दिनांक:-
अधिकारी/कर्मचारी यांचे नाव व पदनाम ( )